।। श्री गणेशाय नमः ।।
कुणाल वधवा
9765595037
9405171771
श्रीराम बोरवेल्स
जमीन, घर, शेती यावर
४.७५, ५ व ६ इंची बोर करुन मिळेल.
तसेच सबमर्सिबल पंप बसवून मिळेल.

१४, राधाकृष्णन शॉपींग सेंटर, झाशी राणी चौक, मनपाजवळ, धुळे



# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

POST REGD.NO./DHL/53/24-26

संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.२४८ ■ गुरुवार ११ जुन २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४



बॉम्बे चष्माघर
गल्ली नं.५, पारोळारोड कॉर्नर, धुळे
फोन : 235222, मो.9021853108


## पाकव्याप्त काश्मिरात बेरोजगारांचे आंदोलन चिरडले गोळीबारात एकोणावीस मुलांसह सात गर्भवती ठार



**नवी दिल्ली, दि. १० : पाकिस्तान व्याप्त जम्मू आणि काश्मीर मध्ये पाच ते नऊ जून दरम्यान पाकिस्तानी सुरक्षा दलांनी अराजक कृत्ये करत रक्तपात केला. एका गोपनीय अहवालानुसार या हिंसाचारात डझनभर लोकांचा मृत्यू झाला आहे. ज्यामध्ये १९ मुले आणि ७ गर्भवती महिलांचा समावेश आहे. जॉइंट अवामी क्शन कमिटीचे आंदोलक मानवी हक्क उल्लंघन, महागाई, बेरोजगारी आणि आर्थिक संकट विरुद्ध आंदोलन करत होते. ज्यांना चिरडण्यासाठी ही कारवाई करण्यात आली. दरम्यान, भारताच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने या कारवाईचा तीव्र निषेध केला आहे.**

**चौदा हजार कर्मचारी तैनात**

आंदोलनाला दडपण्यासाठी पाकिस्तानमधून सुमारे चौदा हजार सुरक्षा कर्मचारी तैनात करण्यात आले. त्यांनी निशस्त्र आंदोलकांवर थेट गोळीबार केला. तसेच अनेक नेत्यांना ठार करण्यात आले. काहींना जखमी करीत ताब्यात घेण्यात आले. या कारवाईची माहिती आणि पुरावे बाहेर जाऊ नयेत म्हणून या भागात इंटरनेट आणि दळणवळण सेवांवर निर्बंध लादण्यात आले आहेत. पाकिस्तानी अधिकाऱ्यांचा असा दावा आहे की, जेएएसीने बंदुका आणि पेट्रोल बॉम्बचा वापर करून गनिमी काव्याने हल्ला केल्यामुळे त्यांना ही कारवाई करावी लागली.


**भारताकडून निषेध**

भारताच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने या कारवाईचा तीव्र निषेध केला आहे. पाकिस्तान स्वतःचे अपयश लपवण्यासाठी आणि मानवी हक्कांच्या उल्लंघनावरून लक्ष विचलित करण्यासाठी खोट्या बातम्या पसरवत असल्याचा आरोप भारताने केला आहे. दुसरीकडे, दडपशाही होऊनही हे आंदोलन आता मीरपूर, मुझफ्फराबाद, गिलगिट-बाल्टिस्तान, रावळकोट आणि इतर अनेक भागात पसरले आहे. हे आंदोलन आता आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचले असून, यूकेमध्ये काश्मिरी समुदायाने पाकिस्तानी दूतावासाबाहेर निदर्शने केली आहेत. तीसहून अधिक ब्रिटिश खासदारांनी यूके सरकारला पत्र लिहून या प्रकरणात शांततापूर्ण तोडगा काढण्यासाठी हस्तक्षेप करण्याची विनंती केली आहे. (पान ४ वर)

## नरेंद्र मोदींच्या विक्रमाबाबत राम मंदिरात महाआरती

धुळे,दि.१०(प्रतिनिधी)- दि. १० जून २०२६ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सलग सर्वाधिक काळ सेवा करणारे निवडून आलेले पंतप्रधान म्हणून ऐतिहासिक विक्रम प्रस्थापित केल्याबद्दल भारतीय जनता पक्षाच्या पेठ मंडळाच्या वतीने शहरात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी आग्रा रोडवरील प्राचीन श्रीराम मंदिरात भाजपचे जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दीर्घायुष्य, उत्तम आरोग्य आणि उज्ज्वल भविष्यासाठी प्रार्थना करण्यात आली. कार्यक्रमास नगरसेविका जयश्री अहिरराव, कल्पना महाले, ज्येष्ठ नेते विजय पाच्छापूरकर, नगरसेवक रोहित चांदोडे, महिला आघाडी अध्यक्षा सुवर्णा पाटील, मंडलाध्यक्ष पंकज धात्रक, छोटू थोरात, मोहिनी धात्रक, भिकन वराडे प्रमोद चौधरी, विकी परदेशी, किशोर चौधरी, तुषार भागवत, (पान २ वर)

## स्वातंत्र्य सेनानी कै. चुडामण अण्णा पाटील यांच्यावरील अजिंक्य ग्रंथाचे ना.देवेंद्र फडणवीसांच्या हस्ते प्रकाशन



**मुंबई, दि.१०- स्वातंत्र्य संग्राम, सहकार, शिक्षण, समाजकारण आणि जनसेवा या विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणारे स्वातंत्र्यसेनानी, माजी खासदार कै. अण्णासाहेब चुडामण पाटील यांच्या प्रेरणादायी जीवनप्रवासावर आधारित अजिंक्य या चरित्रग्रंथाचा भव्य प्रकाशन सोहळा शुक्रवार, दि. १२ जून २०२६ रोजी दुपारी १२ वाजता टाटा थिएटर, एनसीपीए, नरिमन पॉइंट, मुंबई येथे आयोजित करण्यात आला आहे.**

या ग्रंथाचे प्रकाशन महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते होणार आहे. या प्रसंगी पद्मभूषण श्री. अनुपम खेर (ज्येष्ठ अभिनेते, माजी अध्यक्ष, एफटीआयआय) तसेच प्रख्यात दिग्दर्शक व लेखक सौरभ शुक्ला हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून भाजप प्रदेशाध्यक्ष आ. रविंद्र चव्हाण, महसूल मंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे, जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील, मंत्री ना. गिरीश महाजन, माजी मंत्री आ. अमरीशभाई पटेल, पाणीपुरवठा व राजशिष्टाचार मंत्री ना. जयकुमार रावल, मंत्री ना. आशिष शेलार, ग्रामविकास मंत्री ना. जयकुमार गोरे, वस्त्रोद्योग मंत्री ना. संजय सावकारे, मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री ना. नितेश राणे, भारतीय सांस्कृतिक संबंध परिषदेचे अध्यक्ष डॉ. विनय सहस्रबुद्धे तसेच भाजप महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्ष आ. चित्रा वाघ यांची उपस्थिती लाभणार आहे.

**संघर्षातून उभे राहिलेले नेतृत्व**

कै. अण्णासाहेब चुडामण पाटील यांनी स्वातंत्र्य चळवळीतील सहभाग, ग्रामीण विकास, शिक्षण प्रसार, सहकार क्षेत्राची उभारणी आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी केलेला संघर्ष यामुळे खानदेशासह महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनात वेगळी ओळख निर्माण केली. त्यांच्या कार्याचा प्रेरणादायी वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने अजिंक्य हा चरित्रग्रंथ निर्माण करण्यात आला आहे.

ग्रंथामध्ये अण्णासाहेबांच्या राजकीय, सामाजिक, शैक्षणिक आणि सहकार क्षेत्रातील योगदानाचा सविस्तर आढावा घेण्यात आला असून, त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील नेतृत्वगुण, तत्त्वनिष्ठा, (पान २ वर)

## वनरक्षक, कनिष्ठ सहाय्यकाला नंदुरबारमध्ये लाच घेतांना पकडले

नंदुरबार, दि.१० (प्रतिनिधी)- **जिल्ह्यात लाच घेतांना दोन कर्मचाऱ्यांना रंगे हाथ पकडण्याची कारवाई नंदुरबार लाचलुचपत प्रतिबंध विभागाच्या पथकाने केली. शहादा तालुक्यातील कोंढावळ बीटच्या वनरक्षकाने १७ हजाराची तर धडगाव पंचायत समितीच्या कनिष्ठ सहाय्यकाने ५०० रुपयांची लाच स्विकारली. या दोघांनाही एसीबीच्या पथकाने सापळा रचत लाच घेतांना रंगेहाथ ताब्यात घेतले. या कारवाईमुळे वनविभाग व पंचायत समितीच्या विभागात खळबळ उडाली आहे.**

शहादा तालुक्यातील कोंढावळ बीटच्या वनरक्षकास १७ हजार रुपयांची लाच घेतांना रंगेहात पकडल्याची कारवाई करण्यात आली. तक्रारदार हे फेस ग्रामपंचायत हद्दीतील शेती बांधावरील व माळरानावरील काटेरी बाभूळ झाडे तोडून गुजरात राज्यात विक्रीसाठी नेत होते. मार्च ते मे २०२६ या कालावधीत अशा प्रकारे वाहतूक केल्याप्रकरणी त्यांच्या चारचाकी वाहनावर कोणतीही कायदेशीर कारवाई न करण्याच्या मोबदल्यात कोंढावळ बीटच्या वनरक्षक तेजस्विनी काळू साळुंखे (पाटील) यांनी १७ हजार ५०० रुपयांची लाच मागितल्याची तक्रार नंदुरबार लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे करण्यात आली होती. या तक्रारीची पथकाने पडताळणी केली असता वनरक्षक तेजस्वीनी साळुंखे (पाटील) यानी तक्रारदाराकडे लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. तडजोडीनंतर १७ हजार रुपये देण्याचे ठरले. शहादा-शिरपूर रस्त्यावरील फेस फाटा येथे तक्रारदाराकडून १७हजार रुपयांची लाच घेतांना वनरक्षक तेजस्वीनी साळुंखे यांना रंगेहाथ पकडण्यात आले. यावेळी पथकाने त्यांच्याकडून १७ हजाराची रोकड व मोबाईल जप्त केला. तसेच निवासस्थानी जावून झडतीही घेतली. याप्रकरणी सारंगखेडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई नंदुरबार लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे (पान २ वर)

## देऊळ बंद-२ चा समुह धुळेकरांच्या भेटणार

धुळे, दि.१०- धुळ्यात प्रदर्शनाच्या पहिल्या आठवड्यात ५० कोटीहून अधिक चा व्यवसाय करणारा, प्रेक्षकांच्या मनात प्रचंड प्रमाणात घर करणारा, सर्वांना आपलासा वाटणारा व शेतकरी आत्महत्येचा ज्वलंत प्रश्न मांडून त्यावर योग्य मार्गदर्शन करणारा देऊळ बंद-२ हा चित्रपट महाराष्ट्रासह जगभरात आपला डंका वाजवीत आहे. दि.१२ जून रोजी सायंकाळी सहा वाजता ज्योती चित्रमंदिर थिएटर येथे धुळेकर प्रेक्षकांना प्रत्यक्ष भेटणार आहेत.

कैलास वाणी यांनी स्वामींच्या कृपाशीर्वादाने केलेली ही निर्मिती व प्रेक्षकांची मन जिंकण्याचे कसब असणारे दिग्दर्शक प्रवीण तरटे व त्यांची संपूर्ण (पान २ वर)

## धुळ्यात अवजड वाहनांचा वावर नको शहर वाहतुक शाखेला निवेदन सादर

धुळे,दि.१०(प्रतिनिधी)- **धुळे शहरात दिवसा अवजड वाहनांना प्रवेश बंदी असतानाही नियमांची सर्रास पायमल्ली होत असल्याचे समोर आले आहे. शहरातील अरुंद गल्लयांमध्ये अवजड वाहने घुसवली जात असून, यामुळे शाळकरी मुले आणि नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे. या नियमबाह्य वाहनांवर तात्काळ कायदेशीर कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी शहर वाहतूक शाखेला निवेदन देण्यात आले आहे.**

भारतीय जनता पार्टीचे सोशल मीडिया जिल्हाप्रमुख गोपाल ईश्वर चौधरी आणि मिलिंद टेंभेकर यांनी धुळे शहर वाहतूक शाखेचे प्रमुख पोलीस उपनिरीक्षक महाले यांची भेट घेऊन त्यांना हे निवेदन सुपूर्द केले.



**शाळकरी मुलांना धोका**

शहरातील कमलाबाई शाळेजवळ लहान मुलांची शाळेत येण्या-जाण्यासाठी नेहमीच मोठी वर्दळ असते. असे संवेदनशील ठिकाण असतानाही या परिसरात सर्रासपणे मोठ्या ट्रॅव्हल्स गाड्या पार्क केल्या जात आहेत. तसेच शहराच्या अंतर्गत आणि लहान गल्लयांमध्ये दिवसा अवजड वाहने बिनदिक्कतपणे धावत असल्याने मोठी दुर्घटना घडण्याची भीती निर्माण झाली आहे. कोणतीही अनुचित घटना घडण्यापूर्वीच या बेशिस्त वाहनांवर आणि ट्रॅव्हल्स चालकांवर कडक कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

**एसपी ऑफिससमोर आंदोलनाचा इशारा**

शहरातील वाहतूक व्यवस्था सुधारून या अवैध अवजड वाहनांना आळा न घातल्यास थेट पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा (पान २ वर)

## अंतुर्लीचा बिबट्या वनविभागाच्या सापळ्यात

शिरपूर दि.११ (का.प्र.): **तालुक्यातील अंतुर्ली परिसरात शेतकऱ्यांमधील दहशतीचे कारण ठरलेल्या बिबट्याला शहादा वनविभागाने जेरबंद केले. वनविभागाने लावलेल्या पिंजऱ्यात कोंबडीचा फडशा पाडण्यासाठी गेलेला बिबट्या सापळ्यात अडकला. त्याला जेरबंद केल्यामुळे ग्रामस्थांसह शेतकऱ्यांमधून समाधान व्यक्त करण्यात आले.**

अंतुर्ली परिसरात ठिकठिकाणी बिबट्याने दर्शन दिल्यामुळे शेतकरी धास्तावले होते. पाळीव गुरे, शेळ्या, भटके कुत्रे यांचा फडशा पाडल्यामुळे परिसरात दहशत होती. एक जूनला शेतात पाणी भरण्यासाठी गेलेले अंतुर्ली येथील शेतकरी बालू साहेबराव ईशी यांच्यावर बिबट्याने हल्याचा प्रयत्न केला होता. प्रसंगावधान राखून त्यांनी बचाव केला. या घटनेनंतर ग्रामस्थांनी वनविभागाकडे पाठपुरावा केला. परिणामी शहादा येथील वनविभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अंतुर्ली शिवारात पिंजरा व ट्रॅप कॅमेरे लावले होते.

पिंजऱ्यात बोकड ठेवल्यानंतरही बिबट्या न आल्याने वनविभागाने कोंबडी ठेवली. या आमिषाला बिबट्या बळी पडला. १० जूनला पहाटे चारला तो जेरबंद झाला. हा प्रकार कॅमेऱ्याद्वारे लक्षात येताच अधिकाऱ्यांनी घटनास्थळी पोहचून पिंजऱ्यासह बिबट्याला ताब्यात घेतले. त्याची वैद्यकीय तपासणी करुन नैसर्गिक अधिवासात सोडण्यात येणार (पान २ वर)

## अवैध प्रवासी वाहतुकीचा एस.टी.वर परिणाम; दोनशे मिटर नो पार्किंग झोन

**धुळे, दि.१०- अवैध प्रवासी वाहतुकीमुळे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या उत्पन्नावर विपरित परिणाम होत असून एस.टी.प्रवाशांना पुर्ववत आपल्याकडे वळविण्यासह उत्पन्न वाढीसाठी एस.टी. बस स्थानकापासून दोनशे मिटर पर्यंत नो पार्किंग झोन ची प्रभावी अंमलबजावणी करण्यास प्रारंभ करण्यात आला आहे. दि.१५ जुन पर्यंत ही मोहिम राबविण्यात येणार आहे.**



राज्य परिवहन महामंडळाचे अध्यक्ष तथा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी विविध आढावा बैठकांमध्ये अवैध प्रवासी वाहतुकीमुळे एस.टी.च्या महसुलात घट होत असल्याचे व्यक्त केले. त्यानुसार रा.प.महामंडळात नव्याने रूजू झालेल्या मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी तथा पोलीस उप महानिरिक्षक डॉ.प्रियंका नारनवरे यांच्या पुढाकाराने राज्यातील सर्व विभागांना विशेष तपासणी मोहिम राबविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. (पान २ वर)

## वीज कंपनीविरोधात ठिय्या आंदोलन

शिरपूर दि.११ (का.प्र.): येथील शिरपूर फर्स्ट संघटना, शहर आणि ग्रामीण भागातील वीज ग्राहक व शेतकऱ्यांनी अपुरा वीजपुरवठा, महावितरणचा गलथान कारभार या विरोधात दहा जूनला शिरपुरातील वीज उपकेंद्राच्या परिसरातील कार्यालयाबाहेर तोरण बांधा व ठिय्या आंदोलन केले.

वीज कंपनीच्या कार्यालयाच्या दाराला वीजबिलांच्या झेरॉक्स प्रतींचे तोरण बांधण्यात आले. कार्यालयाच्या आवारात आंदोलकांनी ठिय्या आंदोलन करुन शहर व ग्रामीण भागातील वीज ग्राहकांना वापराच्या तुलनेत अवाजवी वीजबिले देणे, शेतकऱ्यांना (पान २ वर)

## निकुंभे येथे मयताच्या अंतयात्रेत जमाव उग्र झाला सोळा जणांवर गुन्हा; दशरथ ठाकरेला अटक

सोनगीरदि.१०(प्रतिनिधी)- **धुळे तालुक्यातील निकुंभे गावात एका खुनाच्या गुन्ह्यातील मयताच्या अंत्ययात्रेत जमाव उग्र होऊन आरोपींच्या घरांची तोडफोड केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आणि जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांना सौम्य लाठीमार करावा लागला. दरम्यान, या खून प्रकरणातील आरोपीला सोनगीर पोलिसांनी अटक केली असून, त्याला बुधवारी न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. तर दुसरीकडे, अंत्ययात्रेत राडा करणाऱ्या निकुंभे गावातील १६ जणांविरुद्ध सोनगीर पोलिसांनी सरकारी कामात अडथळा आणणे, दंगल घडवणे आणि मालमत्तेचे नुकसान केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.**

निकुंभे गावातील रहिवासी शानाभाऊ संभू पाटील (वय ५०) यांची दशरथ किसन ठाकरे याने डोक्यात लोखंडी रॉड मारून हत्या केली होती. याप्रकरणी सोनगीर पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलिसांनी तत्परता मुख्य आरोपी दशरथ ठाकरे याला अटक केली. त्याला बुधवारी न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने आरोपीला दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. मंगळवार दि.९ जून रोजी धुळे सिव्हिल हॉस्पिटलमध्ये शवविच्छेदन झाल्यानंतर मयताचे शव अंत्यसंस्कारासाठी निकुंभे गावात आणण्यात आले होते. गावातील तणावपूर्ण वातावरण पाहता उपविभागीय पोलीस अधिकारी संजय बांबळे आणि सोनगीर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सपोनि तुषार देवरे यांच्यासह मोठा पोलीस फौजफाटा, महिला अंमलदार आणि आर.सी.पी. प्लाटूनचा कडक बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.सायंकाळी ७:३० वाजेच्या सुमारास अंत्ययात्रा स्मशानभूमीकडे जात असताना, मयताच्या बाजूने असलेले गावातील लोक आरोपींच्या वस्तीजवळ आले. तिथे जमाव अचानक अतिशय उग्र झाला आणि त्यांनी आरोपींच्या घरांची तोडफोड करत नुकसान करण्यास सुरुवात केली. बंदोबस्तावर असलेल्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी जमावाला शांत राहण्याचे आवाहन केले आणि कायदा हातात न घेण्याच्या सूचना केल्या. मात्र, (पान ४ वर)

## शिंगावे येथे अल्पवयीन मुलीचा विनयभंग

शिरपूर दि.११ (का.प्र.): शेतमजूर अल्पवयीन मुलीस पैशांचे आमिष दाखवून अश्लील संभाषण व कृत्य करण्याचा प्रयतक केल्याच्या संशयावरुन युवकाविरोधात शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. ही घटना नऊ जूनला सकाळी नऊला तालुक्यातील शिंगावे येथे घडली. कमलेश भाईदास पाटील (रा. शिंगावे) असे संशयिताचे नाव आहे. त्याच्याविरोधात विनयभंग, पॉस्को व अॅट्रॉसिटी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून डीवायएसपी विश्वजीत जाधव तपास करीत आहेत. संशयिताला पोलिसांनी अटक केली.


**दिपक ज्वेलर्स**
सोने- 22 K -1,34,650 रु.+3% GST
सोने- 24 K -1,47,000 रु.+3% GST
चांदी- 2,37,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३


## दरा धरणाच्या कालव्याखाली जाणाऱ्या जमिनींचा योग्य मोबदला देण्यात यावा

शहादा,दि.१०(प्रतिनिधी)- **तालुक्यातील दरा धरणातील कालव्याखाली जाणाऱ्या जमिनीचा योग्य मोबदला, नुकसान भरपाई देण्यात यावी, अशी मागणी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्यावतीने करण्यात आली असून याबाबत जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले आहे.**

सदरच्या निवेदनात म्हटले आहे की, दरा गावातील अनेक शेतकऱ्यांची शेतीजमीन दरा धरणाच्या कालव्याखाली जात असून त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. विशेषतः अल्पभूधारक शेतकऱ्यांची शेती यामुळे बाधित होत असल्याने त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे. अनेक शेतकरी अल्प-अत्यल्प भूधारक असून त्यांचा संसाराचा गाडा पूर्णतः शेतीवर अवलंबून असून त्यांच्या उत्पन्नाचे प्रमुख साधन जमीन आहे. कालव्याच्या कामामुळे शेतकऱ्यांची सुपीक जमीन बुडीत क्षेत्रात जात



असल्याने भविष्यात शेती करणे अशक्य होणार आहे. त्यामुळे संबंधित शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसणार असून त्यांच्या कुटुंबांवरही आर्थिक संकट येऊन त्याचा विपरीत परिणाम होणार आहे. दरा धरणाच्या कालव्यामुळे बाधित झालेल्या सर्व शेतकऱ्यांची तातडीने पाहणी करून त्यांना शासनाच्या नियमानुसार योग्य नुकसान भरपाई मंजूर करण्यात यावी (पान ४ वर)

## प्रेरणा केंद्रातर्फे पर्यावरण दिन

शिरपूर दि.११ (का.प्र.): माविम, धुळे अंतर्गत येथील प्रेरणा लोकसंचलित साधन केंद्रातर्फे तालुक्यातील थाळनेर व करवंद गावात जागतिक पर्यावरण दिनानिमित्त विविध उपक्रम राबवण्यात आले. प्रेरणा केंद्राच्या व्यवस्थापिका नीता बाविस्कर यांनी जागतिक पर्यावरण दिनाचे महत्त्व, हवामानातील बदल, वाढते तापमान, प्लास्टिक प्रदूषण, जंगलतोड यासारख्या गंभीर समस्यांविषयी माहिती व उपाय सांगितले. उपस्थित महिलांना रोपांचे वाटप करुन पर्यावरणाचे समतोल राखण्यासाठी प्रति व्यक्ती एक झाड लावणे (पान ४ वर)


## सरपंचाच्या घरातून चौऱ्याहत्तर हजार कुलूप व कडीकोंडा तोडून केले लंपास

**धुळे, दि.१०- शिंदखेडा तालुक्यातील दोंडाईचा पार्श्वनाथ नगरात पहाटेच्या दरम्यान लोकनियुक्त सरपंचाच्या घरातून ७४ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरी झाल्याची घटना घडली आहे. यामुळे एकच खळबळ उडाली आहे. चोरट्यांचा सगळा प्रताप सीसीटीव्ही कॅमेरात कैद झाला आहे. त्या आधारे पोलिसांचा तपास सुरू आहे. पोलिसांनी गस्त वाढवावी अशी नागरिकांची मागणी आहे.**

मिळालेल्या माहितीनुसार शिंदखेडा तालुक्यातील दोंडाईचा पार्श्वनाथ नगरात राहणारे लोकनियुक्त सरपंच सुवर्णसिंग कोमलसिंग गिरासे यांचे घरात चोरट्याने नऊ जून २०२६ पहाटे



चार ते सकाळी सहा वाजेच्या दरम्यान घर बंद असताना संधीचे सोने केले.कोणीतरी व्यक्तीने घराचे मुख्य दाराचे कुलूप कडीकोंडा तोडून आत प्रवेश करून घरातील कपाट फोडून कपाटातील साहित्य फेकून देत १९ ग्रॅम सोन्याची मंगल पोत तिची किंमत ४९ हजार रुपये, पंचवीस हजार रुपये रोख रक्कम असा एकूण ७४ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून चोरटा पसार झाला. ही बाब सकाळी सुवर्णसिंग गिरासे यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी पोलिसांना माहिती दिली पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. अधिक तपासकामी श्वानपथक ठसे तज्ञ फॉरेन्सिक व्हनची मदत घेण्यात आली. त्यानंतर नऊ जून २०२६ दुपारी एक वाजून २३ (पान ४ वर)



**सेंद्रिय जांभुळ**
संकेत नित्या फार्मचे उत्कृष्ट सेंद्रिय जांभुळ उपलब्ध
✻ संपर्क ✻
वेळ : सकाळी ११ ते रात्री ८ वाजेपर्यंत
दै.आपला महाराष्ट्र कार्यालय
वीर सावरकर मार्ग-धुळे. ०२५६२-२३५३९६, २३८३९६


## नर्सिंगच्या विद्यार्थीनींना पर्यायी जागा उपलब्ध करून द्या- पालकांची मागणी

**धुळे, दि,१०- शहरातील ट्रेनिंग कॉलेज ऑफ नर्सिंगची इमारत जिर्ण झालेली असल्याने पर्यायी व्यवस्था करण्याबाबत प्रशासनाने होस्टेलमधील मुलींच्या पालकांना सांगितले. नर्सिंगचे शिक्षण घेण्यासाठी घराबाहेर पडलेल्या या विद्यार्थीनींचे शहरात कोणीही नातेवाईक नाहीत. त्यामुळे होस्टेलमधील मुलींच्या राहण्यासाठी पर्यायी जागा उपलब्ध करून देण्यात यावी. या मागणीचे निवेदन नर्सिंग कॉलेजमधील विद्यार्थीनीच्या पालकांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.**

निवेदनात नमुद केले आहे की, नर्सिंग कॉलेजमध्ये शिक्षण घेण्यासाठी आलेल्या मुलींना इतर कोणत्याही ठिकाणी ठेवू शकत नाही. मुलींना घरी बसवू परंतू



कोणाच्या भरवशावर शहरात रूम करून राहु देणार नाही. शिक्षण घेणाऱ्या मुली शेतकरी, हातमजुरी करणाऱ्यांच्या मुली आहेत. विद्यार्थीनींना लवकरात लवकर पर्यायी जागा उपलब्ध करून देण्यात यावी. या मागणीचे निवेदन छोटूराम मोरे, भटू मानकर, कुणाल बस्ते, धनराज कुलकर्णी, मुक्ता माळी, भालचंद्र कुवर, विवेक परमार, पुंडलिक धनगर, आनंदा हाटकर, विजयानंद उफाडे, जानीराम पावरा, सुभाष सरक, मनिषा कागणे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहे.

## लोकसेवा हक्क कायदा मनपात घेतला आढावा

धुळे, दि.१०- लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ च्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी चित्रा कुलकर्णी यांनी महापालिकेस भेट दिली. लोकसेवा हक्क कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या विविध विभागांची पाहणी करून मागील दोन वर्षांतील नोंदवह्यांची तपासणी केली. कामकाजाचा आढावा घेण्यात आला. शासनाच्या सेवा नागरिकांना जलद, पारदर्शक व विहित वेळेच्या आत उपलब्ध व्हाव्यात यासाठी लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन नाशिक विभागाच्या राज्य सेवा हक्क आयुक्त चित्रा कुलकर्णी यांनी केले.

## म.रा.नगराध्यक्ष महासंघाच्या सचिवपदी लोकनियुक्त अभिजित पाटलांची निवड

**शहादा, दि.१० (प्रतिनिधी)- महाराष्ट्र राज्य नगराध्यक्ष महासंघाच्या कार्यकारिणीत शहादा नगरपरिषदेचे लोकनियुक्त नगराध्यक्ष अभिजित विमलबेन मोतीलाल पाटील यांची सचिवपदी निवड करण्यात आली.**



मुंबई येथील अंधेरी परिसरात असलेल्या अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मुख्यालयात नगरपरिषदा महासंघाची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत महाराष्ट्र राज्य नगराध्यक्ष महासंघाच्या नव्याने कार्यकारिणी गठीत करण्याची घोषणा करण्यात आली. यामध्ये शहाद्याचे लोकनियुक्त नगराध्यक्ष अभिजित पाटील यांची महासंघाच्या सचिवपदी निवड करण्यात आली.

महाराष्ट्र राज्य नगर परिषद महासंघ हा राज्यातील सुमारे ३९५ नगरपरिषदांच्या नगराध्यक्षांचा प्रतिनिधी महासंघ असून, नगरपरिषदांशी संबंधित विविध समस्या, प्रलंबित प्रश्न तसेच धोरणात्मक विषयांवर कार्यरत आहे.

# आपला महाराष्ट्र

# गुरूजी ! परतुनी कधी येणार..!

पू. साने गुरुजींची आज पुण्यतिथी आहे. ११ जून १९५० रोजी गुरुजींनी आपली जीवन यात्रा संपविली. आज गुरुजी जिवंत असते तर त्यांनी रोज आत्महत्या केली असती. त्यामुळे गुरुजींच्या आत्महत्येच्या संदर्भात ज्यांनी ज्यांनी प्रश्न उपस्थित केले त्यात विचारवंत देखील आहेत. इतक्या वर्षानंतर सुद्धा त्याच्या प्रश्नाचे उत्तर त्यांना अजून सापडलेले नाही. परंतु आचार्य अत्र्यांनी तेव्हाच त्यांच्या दैनिक मराठा मध्ये लेख लिहून मृत्यूचे चुंबन घेणारा महाकवी असे गुरुजींच्या मृत्यू संदर्भात म्हटलेले आहे. मृत्यूचे आणि मानवी जीवनाचे नाते जेवढे सनातन आहे तेवढेच गहन आहे. जीवनाचा पूर्णविराम म्हणजे मृत्यू, हे शाश्वत सत्य अजाणत्या वयापासून आपल्या मनावर बिंबविण्याचा प्रयत्न अनेक मार्गांनी करण्यात आलेला आहे. आपल्या जीवनप्रवासात मृत्यूच्या सोहळ्याला सर्वाधिक महत्त्व प्राप्त झालेले आहे. मोठमोठ्या प्रतिभावंतांनीही मृत्यूची महती गायला महाकाव्यांची निर्मिती केली आहे. साने गुरुजींच्या मृत्यूच्या संदर्भात त्यांच्यावर लिहिताना आचार्य अत्रेंनी 'मृत्यूचे चुंबन घेणारा महाकवी' असा लेख लिहून मृत्यूची महती विषद केली होती. माणूस जगतो कशासाठी, हा प्रश्न जेव्हा सर्वसामान्य माणसाला पडतो तेव्हा तो या प्रश्नांची उत्तरे मिळत नाहीत म्हणून आयुष्यातल्या सगळ्या प्रश्नांच्या उत्तरासाठी मृत्यू या उत्तराकडे अंगुली निर्देश करतो किंवा आयुष्यातल्या अनुत्तरीत, प्रश्नांच्या जवळ आपण थकून भागून, येत असतो. आपले आयुष्य पुढे भकास, विदीर्ण असल्याची प्रचीती अनेक पध्दतीने आपल्याला येते तेव्हा आपण क्षणांचाही विचार न करता मृत्यूकडे जाण्याचा निर्णय घेतो. मृत्यू हा सोहळा आहे असे आपण म्हणत असतो.

“मरणात खरोखर जग जगते अधि मरण अमरपण ये मग ते असे कवी भा.रा. तांबे यांनी आपल्या कवितेतून मृत्यूच्या अमरत्वाचे गुणगान केले आहे. तांबे यांच्याप्रमाणेच अनेक प्रतिभावंतांच्या काव्यातून मृत्यूच्या संदर्भात हाच सूर आळविला गेला आहे. मृत्यू हे सनातन सत्य असले तरी त्याविषयी माणूस एवढा हवालदिल का असतो या प्रश्नाचे उत्तर भीतीतून निर्माण झालेले आहे. मरण कुणालाही नको आहे. तरीही ललित साहित्यातून, वैचारिक वाङ्मयातून मृत्यूचे गोडवे का गायिले जातात हे कोडे अनाकलनीय आहे. गुरुजींनी आत्महत्या केली त्याप्रमाणेच देशातील अनेक मोठ्या लोकांनी आत्महत्या केल्या. सॉक्रेटिसने विष प्राशनाची शिक्षा भोगली. काहींना तुमचे अवतार कार्य आता संपले आहे असे सांगून समाधी घेण्यास बाध्य करणे किंवा संबंधितांनी समाधी घेणे हा देखील आत्महत्येचाच प्रकार असतो. आपण त्याला अध्यात्माचा मुलामा देतो. गुरुजींचा भ्रमनिरास झाला होता मात्र आणखी एक कारण त्याच्या पाठीमागे होते. आणि ते म्हणजे गुरुजींना स्वतःचे शरीर थकल्याचे दिसत होते. कारण पन्नास वर्षांच्या कालखंडात गुरुजींनी खूप पायपीट केली होती. अनेक तुरुंगांच्या वाऱ्या केल्या होत्या. कॉंग्रेससाठी पत्रकारितेसाठी आणि लोकांचे प्रबोधन करण्यासाठी तसेच मुलांचे मनोरंजन करण्यासाठी गुरुजी आयुष्यभर झटले. त्यामुळे गुरुजींचे शरीर थकले होते. आपण खाटेवर पडलो. दुसरे लोक आपली सेवा करीत आहेत, आपली काळजी घेत आहेत. ते गुरुजींना नको होते. त्या केवळ कल्पनेमुळे गुरुजींचे अंग थरारून जायचे. आपल्या सेवेत असणाऱ्यांची सार्वजनिक कामे किंवा देश सेवा यात खंड पडेल अशीही त्यांना खंत वाटत होती. इतका पुढचा विचार गुरुजी करीत असत. त्याचबरोबर आणखी एक कारण घडले ते म्हणजे ३० जानेवारी १९४८ रोजी गुरुजींची ज्यांच्यावर अपार श्रद्धा होती त्या गांधीजींचा खून महाराष्ट्रीयन माणसाने केला याचे शल्य गुरुजींना फार बोचत होते. म्हणून त्यांनी आता आपले अवतार कार्य संपले आता जगण्यात काही अर्थ नाही असे ठरविले होते. जेव्हा त्यांनी हे ठरविले तेव्हा खादीची नवी शुभ्र वस्त्रे त्यांनी परिधान केली. आणि शेवटी एक चिठ्ठी लिहिली ती मधु लिमये यांच्या नावाची होती. त्यात देखील त्यांनी देशात समाजवाद येवो. त्यासाठी तुम्ही सर्वांनी गुण्यागोविंदाने काम करावे. भारत मातेचे रक्षण करावे असे म्हटले होते इतकी गुरुजींना देशाची चिंता होती.

खानदेश वर गुरुजींचे विशेष प्रेम होते आणि ते प्रेम देखील त्या पत्रात गुरुजींनी व्यक्त केले. गुरुजी मधु लिमये यांना पत्रातून लिहितात की, प्रिय मधु, मला बहुतेक देवाचे बोलावणे आहे. कर्तव्य हे कठोर असते. तू धरणगाव, एरंडोल, अमळनेरला जा. माझी अखेरची इच्छा सांग की लोकशाही नि सत्याग्रही समाजवादी ध्येयाने खानदेशने महाराष्ट्रात जावे. परंतु मी कोण? खानदेशचा मी चीर ऋणी आहे. त्यांनी पैसे जमविले असले मला द्यायला तर ते मी समाजवादी कार्यास द्या असे सांगत आहे. खानदेश ने मध्ये मला पंधरा हजार रुपये दिले. त्यातील जवळजवळ ११ हजार रुपये वर्षभर खानदेशातील कार्याला दिले. दोन हजार रुपये साधना प्रेस मध्ये घातले आहेत. खानदेशा, क्षमस्व. मी तुला विसरणार नाही. अशाप्रकारे गुरुजी स्वतःचे नव्हतेच. ते देशाचे होते. त्यानी त्यांचे सर्वस्व देशाला अर्पण केलेले होते. यमाने यज्ञात स्वतःची आहुती दिली. आणि माझे कार्य संपले आता पुढची पिढीचे काम करेल असे म्हटले. त्यानुसार गुरुजींनी देखील आपला देह समर्पित केला. आज त्यांच्या विचारांची चौथी पिढी महाराष्ट्रात आणि देशभरात कार्यरत आहे. हेच त्यांचे समर्पण म्हणावे लागेल. काही साहित्यिकांना अजूनही वाटते ही गुरुजींचे साहित्य हे कालबाह्य झालेले आहे. आजच्या जगात गुरुजींच्या साहित्याचा काहीही उपयोग नाही. पण आमचे म्हणणे आहे की,आत्ताच खरी गुरूजींच्या च्या साहित्याची गरज आहे. कारण सामाजिक व्यवस्था अतिशय हाताबाहेर गेली. ती बिघडली असेही म्हणता येईल. जन्माला येणारी नवी पिढी संस्कार घेऊन येत नाही किंवा संस्कार घेऊन पुढे जात नाही कारण तशी व्यवस्थाच आपल्याकडे आज नाही. म्हणूनच गुरुजींनी कष्टातून शाकारलेले राष्ट्रसेवादल असेल, आंतरभारती असेल, ती बाल संस्कारांची केंद्रे आहेत. उद्याच्या देशावर प्रेम करणाऱ्या पिढ्या जन्माला घालण्याची ताकद या संघटनांमध्ये एकेकाळी होती. आज ती ताकद पुन्हा निर्माण व्हावी याची गरज आहे. कारण या संघटना जिवंत राहणे ही काळाची गरज आहे. आजचे युग हे विलक्षण आत्मकेंद्रित असल्यामुळे विश्वव्यापी नवा सांस्कृतिक साम्राज्यवाद वेगाने ठिकठिकाणी जन्म घेत आहे आणि वाढत आहे. माणूस फक्त निमित्त मात्र शिल्लक आहे. अमर्याद गरजांमुळे तो प्रचंड उपभोगवादी झाला आहे. त्या हव्यासात तो निसर्गाचा देखील शत्रू झाला. निसर्गाला आपल्या सुखासाठी आपण संपवून टाकत आहोत याचीही त्याला भ्रांत पडली आहे. असा जो समाज आज आहे त्यांना वाचनाची गरज भासत नाही. सोशल मीडियावर तर असंख्य लोक स्वतः ला विचारवंत म्हणवतात. असलेले ज्ञान पाजळतात. त्यात कुठलाही संदर्भ नसतो कारण त्यांनी वाचलेलेच नसते. छत्रपती शिवाजी महाराज असतील ,छत्रपती संभाजी महाराज असतील, तुकाराम असतील, ज्ञानेश्वर असतील, गांधी असतील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर असतील असे अनेक लोकोत्तर महापुरुष आपल्या देशात होऊन गेले त्यांच्या संदर्भात व्यक्त होतांना एकही संदर्भ पुस्तकातून बाहेर काढला आणि नेटकरी सोशल मीडियावर व्यक्त झाले असे घडत नाही. म्हणूनच त्यांना वाचनाची आवश्यकता आहे.

मग वाचन नेमके कुठले करावे असाही प्रश्न त्यांच्यासमोर निर्माण होऊ शकतो. अशावेळी पूज्य साने गुरुजींचे श्यामची आई आणि भारतीय संस्कृती ही पुस्तके जरूर वाचली पाहिजेत. नव्या पिढीने तर अवश्य वाचली पाहिजेत. त्या वाचनातून नव्या पिढीला आई कळेल. तिचे मातृत्व कळेल. भारतीय संस्कृती संस्कृती कळेल. त्यातील परंपरा करतील. श्यामची आई सर्व थरातील लोकांसाठी म्हणूनच उपयुक्त आहे. मनाचा शोध घेणारी, आणि संस्कारचे भंडार तुमच्या पुढ्यात ठेवणारी श्यामची आई आहे. आचार्य अत्रे यांनी मातेच्या ममतेचे महामंगल स्तोत्र असे श्यामची आई संदर्भात म्हटलेले आहे ते यथार्थ वाटते. गुरुजी भारतीय संस्कृतीचे भाष्यकार होते. खानदेशाला लाभलेले ते वैचारिक अधिष्ठान होते. गुरुजी नेहमी म्हणत असतात की मी जीवनाचा नम्र उपासक आहे. गुरुजींनी खरोखरच आयुष्यभर समाजाच्या प्रबोधनाची उपासना केली. जीवनशैलीची उपासना केली. गुरुजींची आंदोलने ही गांधी मार्गाची आंदोलने होती. त्या संदर्भात त्यांनी जी काव्ये केली की प्रचंड प्रेरणादायी होती. आता उठवू सारे रान आता पेटवू सारे रान, शेतकऱ्यांच्या राज्यासाठी लावू पणाला प्राण, कोण आम्हा अडविल कोण आम्हा रडवीलं अडवणूक करणारांची उडवू दाणा दाण असे म्हणणाऱ्या गुरुजींचे साहित्य रडके असूच शकत नाही. ते कधीही कालबाह्य होणार नाही. नवी पिढी खऱ्या अर्थाने संस्कारित करावयाची असेल तर गुरुजींचे साहित्य घराघरातून वाचले गेले पाहिजे अशी आमची धारणा आहे. गुरुजींनी स्वतः लिहिले होते खरा तो एकच धर्म, जगाला प्रेम अर्पावे. हे वाक्य त्यांच्या संपूर्ण जीवनाचे सार आहे. समाजातील अन्याय, विषमता, हिंसा, जातिभेद यामुळे ते अस्वस्थ होत; पण त्याचबरोबर त्या परिस्थितीविरुद्ध उभे राहण्याची प्रेरणा देखील त्यांच्या आंदोलनातून लोकांना मिळत असे.

गुरुजींच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या मृत्यूपेक्षा त्यांच्या जीवनाचा संदेश अधिक महत्त्वाचा वाटतो. त्यांनी निर्माण केलेले संस्कार, बालसाहित्य, सामाजिक समतेची तळमळ, राष्ट्रसेवादल आणि आंतरभारतीसारख्या चळवळी आजही मार्गदर्शक ठरू शकतात. विशेषतः आत्मकेंद्रितता, उपभोगवाद आणि सामाजिक विभाजनाच्या या काळात गुरूजींचे साहित्य नव्याने वाचण्याची गरज अधिक प्रकर्षाने जाणवते. साने गुरुजींना खरी आदरांजली म्हणजे त्यांच्या मृत्यूची कारणमीमांसा करण्यापेक्षा त्यांच्या विचारांना नव्या पिढीपर्यंत पोहोचवणे. श्यामची आई आणि भारतीय संस्कृती यांसारखी पुस्तके नव्या पिढीने वाचणे, हे त्यांच्या स्मृतिंना सर्वात अर्थपूर्ण अभिवादन ठरेल.श्यामची आई आणि भारतीय संस्कृती या ग्रंथांमध्ये केवळ साहित्य नाही, तर माणूस घडविण्याची शक्ती आहे.त्यामुळे गुरूजीं सारख्या महात्म्यांची या देशाला,विशेषतः महाराष्ट्राला फार गरज आहे आणि म्हणूनच असे म्हणावेसे वाटते -- गुरूजी ! परतुनी कधी येणार ...!

पान १ वरुन

## अजिंक्य ग्रंथाचे ना.फडणवीसांच्या हस्ते प्रकाशन

संघर्षशीलता आणि जनसेवेची भूमिका नव्या पिढीसमोर मांडण्यात आली आहे. या सोहळ्यास राज्यातील मंत्री, लोकप्रतिनिधी, साहित्यिक, सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवर, उद्योगक्षेत्रातील प्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते, शिक्षणतज्ज्ञ आणि अण्णासाहेबांचे असंख्य अनुयायी उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमामुळे अण्णासाहेबांच्या कार्याचा गौरव होण्याबरोबरच समाजाला प्रेरणा देणाऱ्या नेतृत्वाचा वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचणार आहे. श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्था, धुळे यांच्या वतीने आयोजित या प्रकाशन सोहळ्यास सर्व नागरिक, साहित्यप्रेमी, सामाजिक कार्यकर्ते, विद्यार्थी आणि अण्णासाहेबांच्या कार्याचे अभ्यासक यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक विनय रोहिदास पाटील व कुणाल रोहिदास पाटील यांनी केले आहे.

## नरेंद्र मोदींच्या विक्रमाबाबत राम मंदिरात महाआरती

पंकज विंचू, नरेंद्र अहिरे, ॲड. किशोर जाधव, अनिल थोरात, चेतन मंडोरे, शिवाजीराव काकडे, यशवंत येवलेकर, विकी महाले, श्यामसुंदर पाटील, जयेश पांडे, किरण रणमळे, शरद बिरारी, पवन जाजू, सुहास आंपळकर, कृष्णा वराडे, सागर लाड, विजय गवळी, अजय नाशिककर, विजू पवार, बंटी धात्रक यांच्यासह भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व शुभेच्छुक मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी उपस्थितांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाने केलेल्या प्रगतीचा गौरव करत त्यांच्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. श्रीराम मंदिरात झालेल्या महाआरतीमुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

## वनरक्षक, कनिष्ठ सहाय्यकाला लाच घेतांना पकडले

पोलीस उपअधीक्षक प्रशांत भरते यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने केली. तपास पोलीस निरीक्षक विकास लोंढे करीत आहेत. दरम्यान, वैयक्तीक सिंचन विहीरीच्या अनुदान रकमेचा प्रलंबित प्रस्तावावर विस्तार अधिकाऱ्यांची स्वाक्षरी घेवून देण्यासाठी ५०० रुपयांची लाच घेतांना धडगाव पंचायत समितीच्या कनिष्ठ सहाय्यकास रंगेहाथ पकडण्यात आले. ही कारवाई नंदुरबार लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने केली. धडगाव तालुक्यातील तक्रारदार यांचे काकांना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत २०२५मध्ये वैयक्तीक सिंचन विहीर बांधकाम करण्यासाठी धडगाव पंचायत समितीकडून ४लाख ९९ हजार ६६१ रुपये इतके अनुदान मंजूर झाले होते. तर अनुदानाचा एक लाख ६२ हजार ६०४ रुपयांचा प्रलंबित रकमेचा प्रस्ताव धडगाव पंचायत समिती कार्यालयाकडे मंजूरीसाठी प्रलंबित होता. या प्रस्ताव मंजूरीच्या चौकशीसाठी तक्रारदार हे धडगाव पंचायत समिती कार्यालयात आले. यावेळी त्यांनी चौकशी केली असता धडगाव पंचायत समितीतील कनिष्ठ सहाय्यक खाअल्या सिंगा पाडवी याने प्रलंबित रक्कम मंजूरीच्या प्रस्तावावर विस्तार अधिकारी यांची स्वाक्षरी नसल्याचे सांगितले. सदर प्रस्तावावर विस्तार अधिकारी यांची स्वाक्षरी घेवून देण्यासाठी ५०० रुपयांची लाच तक्रारदाराकडे मागीतली. या संदर्भात तक्रारदार यांनी नंदुरबार लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली. त्यानुसार पथकाने सापळा रचला असता तक्रारदार यांच्याकडून ५०० रुपयांची लाच घेतांना कनिष्ठ सहाय्यक खाअल्या सिंगा पाडवी यास रंगहाथ पकडण्यात आले आहे.

## अवैध प्रवासी वाहतुकीचा एस.टी.वर परिणाम

या मोहिमेंतर्गत बस स्थानकाच्या दोनशे मिटर परिसरात अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांवर विशेष लक्ष केंद्रीत करण्यात येणार आहे. नियमभंग करणाऱ्यांवर स्थानिक पोलीसांच्या मदतीने कारवाई केली जाणार आहे. धुळे विभागात सुरक्षा व दक्षता अधिकारी दिपक धात्रक, वरीष्ठ आगार व्यवस्थापक पंकज देवरे यांच्या नेतृत्वात आगार प्रशासनाच्या व स्थानिक वाहतूक शाखेच्या पोलीसांच्या मदतीने नो पार्किंग झोन ची अंमलबजावणी करीत असतांना दंडात्मक कारवाई करण्यात आली. धुळे विभागातील धुळे मध्यवर्ती बसस्थानकासह देवपूर, साक्री, नंदुरबार, नवापूर, अक्कलकुवा, शहादा, दोंडाईचा, शिरपूर व शिंदखेडा आगारांच्या अखत्यारीतील सर्व बस स्थानक परिसरात नो पार्किंग झोन ची अंमलबजावणी मोहिम राबविण्यात येणार आहे.

## धुळ्यात अवजड वाहनांचा वावर नको

गोपाल चौधरी आणि मिलिंद टेंभेकर यांनी दिला आहे. निवेदन स्वीकारल्यानंतर पोलीस उपनिरीक्षक महाले यांनी या प्रकरणी योग्य ती कायदेशीर कारवाई करण्याचे आश्वासन दिले आहे.

## देऊळ बंद-२ चा समुह धुळेकरांच्या भेटणार

टीम यांनी हा चित्रपट सामाजिक संदेश देणारा बनवला आहे. विशेष म्हणजे या चित्रपटातून मिळणारे उत्पन्न आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणाकारिता देण्याचा निर्णय पुणे येथिल उद्योजक देऊळ बंद २ चे निर्माते कैलास बापू वाणी नी घेतला आहे हे कौतुकास्पद आहे. देऊळ बंद ची टीम सध्या संपूर्ण महाराष्ट्राचा दौरा करीत आहे. धुळेकर स्वामींभक्तांनी चित्रपट पाहण्यासाठी यावे व देऊळ बंद -२ च्या टीम चा उत्साह वाढवावा असे आवाहन सुनिल चितोडकर, राजेंद्र पाचपुते, आशिष लोखंडे, पंकज पिंगळे, यशवंत येवलेकर, व ज्योती थिएटर चे मालक दिनेश माळी यांचेकडून करण्यात आले आहे.

## अंतुर्लीचा बिबट्या वनविभागाच्या सापळ्यात

आहे. शहादा येथील वन परिक्षेत्र अधिकारी एस.बी.रत्नपारखे, वनरक्षक ईश्वर वसावे, योगेश पावरा, प्रियंका गावित, वन्यजीव रक्षक सागर निकुंभे, वाहनचालक नईम मिर्झा यांनी ही कामगिरी बजावली. प्रवीण शिरसाट, ग्रामस्थ बालू ईशी, रोहित कोळी, संदीप कुवर, संदेश कोळी, नंदुरबार येथील वन्यजीव संरक्षण संस्थेचे मयूर कोळी, अनिकेत कोळी आदिंनी त्यांना मदत केली.

## वीज कंपनीविरोधात ठिय्या आंदोलन

नियमानुसार आठ तास वीजपुरवठा न मिळणे अशा कार्यपद्धतीविरोधात घोषणा दिल्या. त्यानंतर उपअभियंत्यांना निवेदन देण्यात आले. अवाजवी वीजबिलांची तातडीने तपासणी करुन ग्राहकांना न्याय द्यावा, शेतीसाठी नियोजित वेळेनुसार पुरेसा, नियमित वीजपुरवठा करावा, वारंवार वीज खंडीत होणे, कमी दाब व अन्य तांत्रिक अडचणी तातडीने दूर कराव्यात, ग्राहकांच्या प्रलंबित तक्रारींचा तातडीने निपटारा करावा, मीटर रिडींग, निर्मिती व वसुली प्रक्रियेत पूर्णतः पारदर्शकता आणावी, स्मार्ट मीटरमुळे वाढीव वीजबिले येत असल्याच्या तक्रारींची निष्पक्ष चौकशी करावी, स्मार्ट मीटरसंदर्भातील संभ्रम दूर करण्यासाठी विशेष जनजागृती व मार्गदर्शन मोहीम राबवावी, वीजबिल व वीजपुरवठ्याशी संबंधित तक्रारींचा निपटारा करण्यासाठी स्वतंत्र कक्ष स्थापन करुन तेथे सक्षम अधिकाऱ्याची नियुक्ती करावी अशा मागण्या निवेदनातून करण्यात आल्या.

# किसन भिलसह त्याच्या कुटुंबियांवर जिल्हा बंदीची करा; ग्रामस्थांची मागणी

**धुळे, दि.१०- धुळे तालुक्यातील मौजे निकुंभे येथे दि.८ जून २०२६ रोजी सकाळी शानाभाऊ संभू पाटील हे त्यांचे मित्र बंसिलाल यादव पाटील यांनी शानाभाऊ पाटील यांना गुरांच्या खळ्यात खाजगी कामानिमित्त बोलवले. त्या ठिकाणी जात असतांना निकुंभे गावातील दशरथ किसन भिल ठाकरे यांनी अमरधाम रस्त्यावर शानाभाऊ पाटील हे बेसावध असतांना दशरथ किसन भिल ठाकरे याने लोखंडी पहारीने शानाभाऊ पाटील यांच्या डोक्यात प्रहार केल्याने त्यांचा मृत्यू झाला. गावात दहशत माजविणाऱ्या किसन भिल ठाकरे सह त्याच्या कुटुंबातील सर्व महिला, पुरूषांना कायमस्वरूपी जिल्हाबंदीची कारवाई करण्यात यावी. यामागणीचे निवेदन निकुंभे गावातील ग्रामस्थांनी पोलीस प्रशासनाला दिले.**

निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, निकुंभे गावातील दशरथ किसन भिल ठाकरे यांनी पहारीने शानाभाऊ पाटील यांच्यावर प्राणघातक हल्ला केल्याने उपचारा दरम्यान शानाभाऊ पाटील यांचा मृत्यू झाला असला तरी दशरथ किसन भिल ठाकरे याला अद्याप अटक किंवा कोणतीही कारवाई झालेली नाही. किसन भगवान भिल ठाकरे, दशरथ किसन भिल ठाकरे व त्यांच्या कुटूंबियांतील इतर सदस्यांपासून गावातील इतर नागरिकांना जिवीत व आर्थिक धोका आहे. या कुटूंबाला मागील वीस वर्षांपूर्वी देखील हद्पार करण्यात आले होते.


**NAME CHANGE**

MY OLD NAME WAS
**SHAEESTA BI SHAIKH SAHEB LAL**
MY NEW NAME IS
**SHAIKH SHAEESTA BI SHAHEBLAL**
**ADD- KASAI WADA SONGIR, TAL.DIST. DHULE-423009**

**NAME CHANGE**

MY PREVIOUS NAME WAS
**BABANBAI MANGILALL JAIN**
AND MY NEW NAME IS
**BADAMBAI MANGILAL JAIN**
**ADD- 19/B, VIMAL VIDYA NITYANAND SOCIETY NEAR JALARAM MANDIR, DHULE-424001**

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस बँक, पतसंस्था, सर्व वित्तीय संस्था, सावकार व इतर सर्व संबंधितांना या जाहीर नोटीसी अन्वये कळविण्यात येते की,......

खालील परिशिष्टात नमूद श्री.संजय अर्जुनदास मेहता आणि सौ.मनिषा संजय मेहता यांचे मालकी व ताबे उपभोगातील मौजे महिंदळे ता.जि.धुळे येथील कुमारनगर भागातील सि.स.नं. ५३१९ चे एकूण क्षेत्र ४४.३० चौ.मी. सत्ताप्रकार अ यात आरसीसी मधील दुमजली बांधीव घराचे क्षेत्र तळ मजला १२.१२ चौ.मी. +पहिला मजला २२.१२ चौ.मी. असे एकूण बांधीव क्षेत्र ४४.१४ चौ.मी. व बखळ जागेसह (यास ब्लॉक नं. कयु/२ पुर्वेकडुन खोली नं.५ व पश्चिमेकडून/रुम नं.६ असा आहे) ही आमचे अशिलाने कायम स्वरुपाने खरेदी करण्याचा सौदा केलेला असून लवकरच खरेदी व्यवहार पूर्ण होणार आहे.

खालील नमूद परिशिष्टातील सदर मिळकतीवर कोणाचा हक्क, दान, अधिकार, हिस्सा, वहिवाट, तारण, गहाण, कर्ज, जामीन, बोझा, सौदा, टाच, मृत्युपत्र, सौदापावती, कुळवहिवाट, ऋणभार, जप्ती, आरक्षण, बक्षीस, मुखत्यारपत्र, भाडेकरार, खाजगी सावकार अगर इतर न्यायीक प्रकरणे, कोणत्याही स्वरुपाचे हक्क, हितसंबंध, मोजमापासंबंधी काही तक्रार असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसात नोटीसीत नमूद पत्यावर समक्ष येवून हरकत नोंदवावी, तोंडी हरकती तसेच वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात आलेल्या हरकती गृहित धरल्या जाणार नाहीत. तसेच मुदती नंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. वर नमुद मुदतीत कोणाचीही काहीएक हरकत न आल्यास सदर मिळकत निर्बोध व निर्बोज तसेच हस्तांतरणीय आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर आलेली कोणाचीही तक्रार, हरकत आमचे अशिल व त्याचे वारसांवर बंधनकारक राहणार नाही. याची सर्वांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे. कळावे.

**परिशिष्ट**

मौजे महिंदळे ता.जि.धुळे येथील कुमारनगर भागातील सि.स.नं. ५३१९ चे एकूण क्षेत्र ४४.३० चौ.मी. सत्ताप्रकार अ यात आरसीसी मधील दुमजली बांधीव घराचे क्षेत्र तळ मजला २२.१२ चौ.मी.+ पहिला मजला २२.१२ चौ.मी. असे एकूण बांधीव क्षेत्र ४४.१४ चौ.मी. व बखळ जागेसह (यास ब्लॉक नं. कयु/२ पुर्वेकडुन खोली नं.५ व पश्चिमेकडून/रुम नं.६ असा आहे). ही श्री.संजय अर्जुनदास मेहता आणि सौ.मनिषा संजय मेहता यांचे मालकीची व ताबे उपभोगातील मिळकत विक्री करण्याचा सौदा केला आहे.

त्यास चतु:सिमा खरेदीप्रमाणे (पुर्वेकडून) .....
पुर्वेस - सि.स.नं.५३२०, पश्चिमेस- सि.स.नं.५३१८,
दक्षिणेस- बोळ रस्ता, उत्तरेस- वापर व रस्ता.

सदर नोटीस आमचे अशिलाने दिलेल्या माहितीवरुन प्रसिध्दिस दिली असे.
धुळे, दि.१०/०६/२०२६.

**ॲड.सौरभा सुनिल जैन**
'शत्रुंजय', 22/A, शिवशंकर कॉलनी चितोड रोड, धुळे.
**फोन नं.०२५६२-३५९५१४**

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था, खाजगी सावकार व सर्व संबंधीतीयांना विशेष करुन आदिल असद कुरेशी यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते,

आमचे पक्षकार महंमद असद महंमद बिस्मिल्लाह खाटीक, रा.प्लॉट नं.२४४, स.नं.६१६, अंबिका नगर, नॅशनल हायवेच्या मागे, कमरुज जामा मस्जिद जवळ, धुळे-४२४००१ यांचा मुलगा नामे आदिल असद कुरेशी हा असून त्याच्यात आमचे पक्षकार यांच्यात वाद झाल्यामुळे व तो आमचे पक्षकार यांना शारिरिक, मानसिक व आर्थिक त्रात देत असल्यामुळे आमचे पक्षकार यांनी आदिल असद कुरेशी याच्याशी वडील म्हणून असलेले नाते सुमारे ०४ महिन्या पूर्वी पासून संपुष्टात आणलेले आहेत. आदिल असद कुरेशी याच्याशी आमचे पक्षकार व त्यांच्या कुटूंबीयांतील सर्व सदस्यांनी नातेसंबंध तोडून टाकलेले आहेत.

तरी आदिल असद कुरेशी याच्याशी कोणीही कोणत्याही प्रकारे आर्थिक तसेच आमचे पक्षकार यांच्या स्व:मालकीच्या मिळकती बाबत कोणत्याही प्रकार व्यवहार केल्यास तो आमचे पक्षकार यांच्यावर बंधनकारक राहणार नाही. जो कोणी आदिल असद कुरेशी याच्याशी आर्थिक व्यवहार अथवा इतर कोणताही व्यवहार करेल तो त्यास स्वत: जबाबदार राहील. आदिल असद कुरेशी याचा आमच्या पक्षकार यांच्या स्वमालकीच्या मिळकतीत कोणत्याही प्रकारचा हक्क व अधिकार राहिलेला नाही. आमचे पक्षकार यांनी आदिल असद कुरेशी याच्याशी असलेले नातेसंबंध सुमारे ०४ महिन्या पुर्वीपासून तोडून टाकलेले आहेत. त्या काळातील किंवा पुढील काळातील जे काही व्यवहार कोणीही आदिल असद कुरेशी याच्याशी केले असल्यास किंवा करत असल्यास ते आमचे पक्षकार यांच्यावर बंधनकारक राहणार नाहीत. तसे केल्यास जो व्यक्ती आदिल असद कुरेशी याच्याशी व्यवहार करेल तोच व्यक्ती किंवा आदिल असद कुरेशी हे स्वत: जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहिर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहितीवरुन तसेच दिलेल्या अधिकारावरुन व सांगितल्यावरुन त्यांचे तर्फे आमचे मार्फत प्रसिध्दीस दिली असे. कळावे.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.
ठिकाण- , दि.११/०६/२०२६.

**ॲड.रविंद एस.सोनवणे**
निवास/कार्यालय- प्लॉट नं.२९, एकता नगर, बिलाडी रोड, देवपूर, धुळे
**मो.नं.९८५०२५८४३१**

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस, सर्व हितसंबंधीतांना तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था, खाजगी सावकार व सर्व संबंधीतांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, **मौजे नरडाणा ता.शिंदखेडा जि.धुळे येथील बखळ प्लॉटचे भूमापण क्रमांक व उपविभाग १००/५/१ब मधील क्षेत्र १.३१.६२ चौ.मी., आकार १३.९६** या मिळकतीचे हल्ली कब्जेदार व मालक **सुनील रामराव पाटील** यांनी आमचे अशील/पक्षकार **कल्याणी रवींद्र पाटील** यांचे सोबत कायम विक्रीचा सौदा केला असून बयानापोटी रक्कम स्विकारलेली आहे. आमचे अशील सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करणार आहेत.

सदर मिळकती बाबत कोणाचे काही हक्क, हितसंबंध, तारण, गहाणखत, सौदापावती, बोजा, मुखत्यारपत्र, लिज, लिन, वारस हक्क, खावटी कर्ज, मे.कोर्टाचा मनाई हुकुम इतर काही हक्क, हितसंबंध अगर तक्रार असल्यास आवश्यक त्या मुळ कागदपत्रासोबत आपली लेखी हरकत ८ (आठ) दिवसांच्या आत नोटीस प्रसिद्ध झाल्या पासून खालील दिलेल्या पत्त्यावर कळवावे. मुदतील न आलेल्या हरकती तसेच परस्पर वर्तमानपत्रातून घेतलेल्या हरकती आमचे अशीलावर व मिळकतीवर बंधनकारक रहाणार नाही व आमचे अशील खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आमचे अशीलाने दिलेल्या माहिती नुसार त्यांचे तर्फे आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे. कळावे.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.
धुळे, दिनांक- १०/०६/२०२६.

**ॲड.जयेश आर.बारी**
२७, उमराव नगर, देवपूर, धुळे-४२४००५
**मो.नं.९४२१८९००४६**

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे वलवाडी, ता.जि. धुळे येथील सर्व्हे नं.७/१२ पैकी प्लॉट नं.३३ चे क्षेत्र १८७ चौ.मी. यांसी चतु:सिमा पुर्वेस : रस्ता, पश्चिमेस : प्लॉट नं.४०, दक्षिणेस : प्लॉट नं.३४, उत्तरेस : प्लॉट नं.३२. येणे प्रमाणे वर्णनाची मिळकत सौ.शिला अनिल शिरसाठ, रा. घर नं.१२२५/ब, आग्रा रोड, धुळे यांचे मालकीची असून त्यांनी सदरहु मिळकत कायमस्वरूपी विकण्याचा सौदा आमचे अशिलांशी केला आहे.

